बीड । गुरुवार
२२.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ५१
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955


# वैष्णवी हगवणेचा पोस्टमॉर्टम रिपोर्ट अखेर आला समोर; धक्कादायक माहिती उघड

**बीड । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणेने आत्महत्या केल्यानंतर तिचा शवविच्छेदने अहवाल समोर आला आहे. यामध्ये शरीरावर अनेक बोथट जखमा आढळून आल्याचं सांगण्यात आलं आहे. तसंच म ानेच्या अस्थिबंधन दाबामुळे मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनीदेखील एक्सवर हा अहवाल शेअर केला आहे. तसंच अजित पवारांना वैष्णवीला न्याय देणार का? अशी विचारणा केली आहे.



जमीन खरेदीसाठी दोन कोटी रुपये माहेरून आण म्हणून सुनेचा अत्याधिक छळ करून तिची हत्या /आत्महत्या इथपर्यंत मजल म ारणाऱ्या मुळशी तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष राजेंद्र हगवणेला अटक कधी होणार ? अजितदादा, तुम्ही सत्तेत आहात.पदाधिकाऱ्याला वाचवणार की हुंडाबळी ठरलेल्या वैष्णवीला न्याय देणार?, असा सवाल सुषमा अंधारे यांनी विचारला आहे.

वैष्णवीचा मैत्रिणीला केलेला फोन कॉलही आला समोर

वैष्णवीने आपल्या मैत्रिणीला फोन करुन सासरी किती त्रास होत आहे याची माहिती देत व्यथा मांडली होती. हा फोन कॉलही समोर आला आहे. यामध्ये तिने ज्याच्यासाठी सर्वांचा विरोध पत्करुन लग्न केलं तो पतीही साथ देत नसल्याने खंत व्यक्त केली.

तुझ्या मैत्रिणींना तू किती घाणेरडी आहेस हे सांगते. तू शशांकसोबतही कधी एकनिष्ठ राहिली नाहीस. तू फालतू आहे, तू घाणेरडी आहे. घाण शिव्या देऊ लागली. आईला, पप्पांना काहीही बोलू लागली. मगाशी पप्पा, मम्मी बसले होते त्यामुळे मला बोलता आलं नाही. डॅडी मला मारताना पाहत होते. नंतर त्यांनीही माझ्यावर हात उचलला. त्यांनाही खरं वाटलं आहे, असं वैष्णवी फोनवरुन मैत्रिणीला सांगते.

पुढे ती सांगते, पप्पा मला यावर विचार करु म्हणालेत. माझा नवराच माझ्याकडे आला नाही याचं जास्त वाईट वाटत आहे. सासू सासऱ्यांचं असं वागण्याचं काम असतं. पण ज्याच्यामुळे मी त्या घरात गेले, लय चुकलं माझं. सर्वांना विरोध करुन लग्न केलं तिथंच चूक झाली माझी. सगळं बोलणं, समजण्यापलीकडे गेलं आहे. तुला ही छोटी गोष्ट वाटते का? माझ्या आयुष्यात विचारही केला नव्हता. मला इतकं घाण बोललेत, शिव्या देत असतात.

आत्महत्येपूर्वी तिचा हुंड्यासाठी छळ केल्याचा, तिला मारहाण केल्याचं, शरीरावर मारहाणीचे व्रण असल्याचं

▶▶ उर्वरित पान २ वर

# आदित्य, तुलसी, वसंतराव काळे सहित २३३ महाविद्यालयांना प्रवेश बंद

**बीड । प्रतिनिधी**

बाबासाहेब आंबेडकर म राठवाडा विद्यापीठाकडून संलग्नित असलेल्या २३३ महाविद्यालयांना २०२५- २६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला निर्बंध घालण्यात आलेले असून या महाविद्यालयांनी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमांना प्रवेश देऊ नये असे आदेश देण्यात आले आहेत यामुळे संलग्निकरण यादीतील ४८४ महाविद्यालयापैकी २३३ महाविद्यालयात या नव्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार नाही. विद्यापीठाकडून महाविद्यालयावर करण्यात आलेल्या या कारवाईमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे . याबाबत माहिती अशी की विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या २१ नोव्हेंबर २०२४ रोजी च्या ठरावानुसार कुलुगुरु डॉ. विजय फुलारी यांनी याबाबतचे आदेश दिले होते, यासंदर्भात शैक्षणिक विभागासह प्र कुलगुरू डॉ. वाल्मीक सरोदे यांनी वारंवार सूचना देऊनही महाविद्यालयाने ट्रिपल ए मूल्यांकनाबाबत उत्सुकता दाखवली नाही. त्यामुळे अधिष्ठाता मंडळाने अशा २३३ महाविद्यालयावर कारवाईचा बडगा उगारला असून या महाविद्यालयावर प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे. छउ मूल्यांकनासाठी पात्र असूनही २३३ महाविद्यालयांनी मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केलेली नव्हती त्यामुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे. विद्यापीठाच्या अधिपत्याखाली खालील छत्रपती संभाजीनगर, बीड ,जालना आणि धाराशिव या चार जिल्ह्यातील महाविद्यालयामध्ये विविध कला वाणिज्य विज्ञान संगणक व्यवस्थापन फार्मसी आर्किटेक्चर पत्रकारिता अशा शाखांचे विविध अभ्यासक्रम चालवले जातात मात्र झिरो इंटेक ही टिप्पणी देऊन प्रवेशाला स्थगिती देण्यात आलेली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रत्येक परिणामकारक सुनावणीला मिळणार किती लाख आणि तासाला किती आहे विचारविनिमय शुल्क?

**संतोष देशमुख हत्या प्रकरणात उज्वल निकमांची फिस आहे तरी किती ?**

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील म स्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्ती करावी अशी मागणी वाढल्यानंतर सरकारने या प्रकरणात त्यांची नियुक्ती केली आहे. आता या खटल्यात त्यांच्या शुल्काची माहिती समोर येत असून उज्वल निकम यांना या खटल्यातील प्रत्येक परिणामकारक सुनावणीसाठी सरकार दिड लाख रुपये देणार



आहे. तर विचारविनीमय शुल्क म्हणून निकम यांना प्रतितास ५० हजार रुपये मिळणार आहेत. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर राज्यभरात

▶▶ उर्वरित पान २ वर

## हॉर्न वाजवल्याने सटकली, अपहरण करून शेतकऱ्याला टेकडीवर नेलं, बेल्टने अमानुष मारहाण

**बीडमध्ये गीते-मुंडे टोळीचं कांड**

**बीड । प्रतिनिधी**

घरासमोर दुचाकीचा हॉर्न का वाजवितो, असे विचारल्याच्या कारणावरून एका शेतकऱ्याचे अपहरण करून त्याला टेकडीवर नेले. त्यानंतर बेल्टने मारहाण केली. तोंडवर, नाकावर बुक्यांनी मारहाण केली. हा प्रकार जुलै २०२४ मध्ये घडला होता. या मारहाणीचा व्हिडीओ बनवून व्हायरल केला होता. आता नऊ महिन्यानंतर परळी ग्रामीण पोलीस

▶▶ उर्वरित पान २ वर



# छगन भुजबळांनंतर धनंजय मुंडेंच्या गळ्यातही लवकरच मंत्रिपदाची माळ?

**मुंबई । प्रतिनिधी**

जवळपास सहा महिन्यांच्या विश्रांतीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात छगन भुजबळ यांचा समावेश करण्यात आला. भुजबळांसारखा मातब्बर



नेता मंत्रिमंडळात दाखल झाल्यानं महायुती सरकारची ताकद वाढली आहे. काही दिवसांपूर्वी सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी आरोप झाल्यानंतर अजित पवार यांचे निकटवर्तीय धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे राज्यात ओबीसी नेतृत्वाची पोकळी निर्माण झाल्याचे सांगितले जात होते. भुजबळ यांच्या मंत्रिमंडळातील पुनरागमनामुळे ही पोकळी भरून निघेल अशी शक्यता आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती बाबत

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांचे कार्यालयासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे कंत्राटी पद निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याच्या कालावधीसाठी भरण्यासाठी जाहिरात व विहीत केलेला अर्जाचा नमूना या कार्यालयाचे वेबसाईट www.beed.nic.in वर दि.२१.०५.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी उमेदवाराने आपला विहीत नमून्यातील अर्ज -४ साईजच्या पांढऱ्या कागदावर टंकलिखित - हस्तलिखित करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड-४३११२२ या पत्यावर दिनांक २३ मे, २०२५ रोजीपासून ते दि. ०५ जून, २०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत विहीत नमून्यात अर्ज पोहोचेल अशा रितीने

▶▶ उर्वरित पान २ वर

## एपीआयच्या नावाने बनावट सही केल्याचा प्रकार आला समोर

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली येथील १० एकर जागेच्या मालकीवरुन गेली तीन वर्ष सुरु असलेल्या दाव्यामध्ये आतापर्यंत चार अपर्णा वर्मा यांनी या जागेच्या मालकीचा दावा केला आहे. चंदननगरचे तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांच्या ताब्यात सर्व कागदपत्रे असताना व आपण रजेवर असताना अपर्णा वर्मा (रा. दुबई) यांच्या अर्जाचे अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीवर आपली बनावट स्वाक्षरी केली व या बनावट सहीचे आधारे येरवडा सहायक पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ यांच्या परवानगीने चंदननगर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा बनावट

▶▶ उर्वरित पान २ वर

## मुख्याधापिकेने पतीला संपवलं, विद्यार्थ्याच्या मदतीने मृतदेह जंगलात जाळला; अंडरविअर अन् शर्टच्या बटनामुळे यवतामळमधील क्राईम मिस्ट्रीचा उलगडा

**यवतमाळ । प्रतिनिधी**

यवतमाळमधील चौसाळा जंगलात १५ मे रोजी एक मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली होती. त्या मृतदेहामागचं गुढ उकलण्यात यवतमाळ पोलिसांना यश आलं आहे. पोलिस तपासात धक्कादायकउलगडा झाला असून मुख्याध्यापक पत्नीनेच पतीला



विष देऊन त्याचा खून केला आणि विद्यार्थ्यांच्या मदतीने पहाटेच्या सुमारास मृतदेह जंगल परिसरात जाळून टाकल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

फोटोतील शर्ट अन् मृतदेहाजवळील कापडाचा तुकडा सेम- मिळालेल्या माहितीनुसार, शंतनू अरविंद देशमुख (३२, रा. सुयोगनगर) यांचा तो मृतदेह असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. शंतनू १३ मेच्या सायंकाळपासून बेपत्ता होता. तो सनराइज इंग्लिश मीडियम स्कूल येथे शिक्षक म्हणून कार्यरत होता, तर त्याच ठिकाणी पत्नी निधी (वय २३) ही मुख्याध्यापिका होती. प्रेमविवाह असल्याने तो आई-वडिलांपासून विभक्त राहत होता. जंगलात मृतदेह मिळाल्याची माहिती पसरताच शंतनूसोबत बारमध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर

# परळी आगारात नव्या दहा लालपरी!

**अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते नव्या बस प्रवाशांच्या सेवेत रुजू**

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी म हामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह म ान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले.



बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये - जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## दोन लाखांची लाच घेताना सहकारी अधिकाऱ्याला अटक; अंधेरीत एसीबीची कारवाई



**मुंबई । प्रतिनिधी**

तक्रार अर्जावर कारवाई करण्यासाठी चार लाखांची लाचेची मागणी करून दोन लाखांचा पहिला हप्ता घेताना अंधेरीतील के पश्चिम उपनिबंधक सहकारी संस्थेचे सहकारी विकास रामचंद्र कोरडे यांना मंगळवारी (२० मे) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकार्यांनी अटक केली आहे. त्यांच्याच कार्यालयात

▶▶ उर्वरित पान २ वर



# आकाशात वीज चमकत असताना नागरिकांनी घ्यावयाच्या खबरदारी

हंगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या विविध भागात वीज चमकण्याच्या घटना मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. वीज कोसळणे ही एक गंभीर नैसर्गिक आपत्ती असून नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांना खालील खबरदारीचे उपाय काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

वीज चमकत असल्यास घ्यावयाच्या खबरदारी: विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर राहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा.

या गोष्टी करू नका: आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली आंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाईन यांना स्पर्श करू नका. तसेच कुठल्याही विद्युत उपकरणाचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या साह्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडांच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे राहू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारात अथवा खिडकीतून वीज पडताना बाहेर पाहू नका व बाहेर थांबणे तितकेच धोकादायक आहे.

उपयोगी मोबाईल ॲप्सची माहिती:

दामिनी ॲप – हे ॲप भारतीय हवामान विभागाने (IMD) विकसित केले असून विजेच्या गडगडाट आणि संभाव्य ठिकाणांची माहिती नागरिकांना वेळेवर मिळवून देण्याचा उद्देश आहे. हे ॲप आपल्या स्थानाच्या २० किमी परिसरात वीज कोसळण्याची शक्यता असल्यास तात्काळ अलर्ट पाठवते. वापरण्यास अगदी सोपे असून मराठीसह विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे. Google Play Store आणि Apple pp Store वर हे अम्प मोफत उपलब्ध आहे.

सचेत ॲप – हे ॲप आपत्ती व्यवस्थापन विभागाने विकसित केले असून भूकंप, पूर, वीज चमकणे, वादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या अलर्टस पुरवते. स्थानिक हवामान आणि संभाव्य आपत्तींची अचूक माहिती, सजगता आणि मार्गदर्शन यातून मिळते. या ॲपच्या साह्याने नागरिक वेळेत सुरक्षिततेचे पावले उचलू शकतात. Google Play Store आणि Apple pp Store मोफत उपलब्ध आहे.

आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या सुरक्षिततेसाठी वरील खबरदारीचे उपाय वेळेवर आणि शिस्तबद्धपणे पाळावेत. प्रशासन आपत्ती व्यवस्थापनासाठी सदैव सज्ज असून नागरिकांनी देखील सजग राहणे गरजेचे आहे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.

पान ४ वरून पुढे...

## काँग्रेसच्या वतीने...

दादासाहेब तासतोडे, राहुल जाधव, ॲड. विशाल मस्के, रमधन जमाले, मोसिन शेख, गणेश जवकर, कल्याण टेकाळे, हनुमंत घोडके, शेख कादर बाबा, उत्तरेश्वर जाधव, बबलू भाई शेख, रोहित नवले, राम शेळके, हरिभाऊ सावंत, पांडुरंग हराळे, सखाराम बेंडगे, रंजीत शेळके, अमजत कुरेश, शेख मुस्ताक, बाळू गिराम यांच्यासह या रॅलीत बीड शहर मंचचे नितीन जायभाये, बाजीराव ढाकणे, डॉ. संजय तांदळे, ॲड. नितीन वाघमारे यांनी देखील उपस्थित राहून भारतीय सैनिकांप्रती आपल्या संवेदना दर्शवल्या.

## कुर्ला ग्रामस्थांचा...

लवकर करून ती सुरू करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. या निवेदनावर गावातील अनेक मान्यवर, शेतकरी प्रतिनिधी आणि युवकांच्या सह्या असून ग्रामस्थांचा रोष आता उफाळून आला आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर कुर्ला गावात मोठे जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## राष्ट्रवादी काँग्रेस...

कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाच्या असतात. आगामी निवडणुकांमध्ये पक्षाला भरघोस यश प्राप्त करण्यासाठी पक्ष जोमाने कामाला लागला आहे. या अनुषंगाने व पक्ष मजबूती करणाच्या दृष्टीने तालुका निहाय बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी संवाद साधून नवीन पदाधिकारी नेमणुका बाबत सविस्तर चर्चा या बैठका दरम्यान होणार असून प्रदेश अध्याक्षां कडे संभाव्य पदाधिकारी यांची यादी पाठवली जाईल व त्यांच्या आदेशानुसार लवकरच पदाधिकाऱ्यांच्या निवडी घोषीत केल्या जाणार आहेत.सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन आष्टी पाटोदा तालुका राष्ट्रवादीच्या वतीने करण्यात येत आहे.

पान ४ वरून पुढे...

## बीडच्या जिल्हा....

अंतर्गत केंद्रप्रमुख पदी नियमबाह्य पदोत्तरणी नियुक्ती करणाऱ्या दोषी अधिकारी व बोगस केंद्रप्रमुख यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारी कायद्याअंतर्गत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे, व माझ्या विविध मागण्या मान्य न झाल्यास येणाऱ्या काळात कठोर उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष कृष्णा उकंडे यांनी दिला आहे.

## विनयभंग केल्याचे...

फिर्यादीने आरोपीचे विरुद्ध फिर्याद दिलेली असल्याचा एक्टिवात आरोपीचे वतीने ॲड. जे बी बडे यांनी केलेला होता. सदर प्रकरणात सन्माननीय न्यायालयात झालेल्या साक्षी पुराव्यांती ॲड. जे बी बडे यांच्या युक्तिवाद ग्राह्य धरून माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी श्री एन. एम.वाली साहेब यांनी आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणात ॲड. जे बी बडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे राहणार साळेगाव तालुका केज जिल्हा बीड यांची निर्दोष मुक्तता करण्यात आलेली आहे आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे यांच्यावतीने ॲड. जे.बी.बडे धारूर यांनी युक्तिवाद केला त्यांना ॲड. एन.बी.पांचाळ ॲड.एम.बी.भोसले यांनी सहकार्य केले.

## मान्सून पूर्व...

शहरातील मान्सूनपूर्व कामांचे योग्य नियोजन करून सर्व संबंधित यंत्रणांनी एकमेकांशी समन्वय ठेवत. नाल्यांची साफसफाई गटारी स्वच्छ करणे जेणेकरून पाण्याचा योग्य निचरा होईल रस्त्यांवरील खड्डे बुजवणे इतर आवश्यक दुरुस्त्या केल्यास ऐनवेळी यंत्रणांचे धावपळ होणार नाही व नागरिकांची गैरसोय टाळले जाऊ शकते रस्त्यांवर विद्युत तारांना धोकादायक असणाऱ्या झाडांच्या फांद्यांची छाटणी, पावसाच्या पाण्याचा निचरा चांगला होईल यासाठी आवश्यक उपायोजना करणे शहरात सुरू असलेल्या जलवाहिनीच्या कामामुळे शहरातील रस्ते खोदले जात आहेत या रस्त्यांचे काँक्रिटीकरण वेळेत पूर्ण न झाल्यास मान्सून हंगामात शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरण्याचा धोका आहे त्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणावर रोगराई निर्माण होऊ शकते डेंगू सदृश्य आजारांना आळा घालण्यासाठी मानसून पूर्व स्वच्छतेची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करण्याची मोठे आव्हान धारूर नगरपालिका प्रशासनासमोर आहे मान्सून पूर्व कामे गतीने पूर्ण करण्याची मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

पान ४ वरून पुढे...

## एक राज्य...

मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हाअध्यक्ष बापुसाहेब साळुंके बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रमेश्वर कवट बीड जिल्हा उपाध्यक्ष बापुसाहेब मराठे जिल्हा उपाध्यक्ष शाम गायकवाड जिल्हा प्रशिध्दी प्रमुख सुरेश गिराम बीड जिल्हा संघटक राहून शिंदे जिल्हा सरचिटणीस बंडु आप्पा कोडगडे बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके निवेदनाच्या प्रती मा.मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री महसूल मंत्री पालकमंत्री महसूल राज्यमंत्री यांनाही ई-मेल द्वारे पाठवण्यात आल्या त्याचप्रमाणे अप्पर मुख्य सचिव, महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क महाराष्ट्र,नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे यांनाही पाठविण्यात आल्या असे प्रसिद्ध केलेल्या पत्रकात कळविले.

पान ४ वरून पुढे...

## देवडीच्या स्नेहा...

खर्चावर घर गाडा चालत नाही. त्यांनी मुलगा मुलगी असा भेद न मानता मुली शिक्षणात हुशार आसल्याने त्यांच्या आर्धांगिनी सौ मिरा बळीराम झाटे यांनीही आपल्या दोनीही मुलींना चांगले शिक्षण द्यायचे असे मनामध्ये निश्चय केला. स्नेहाचे प्राथमिक शिक्षण १ ते ७ गावातील जिल्हा परिषद व रानबाई देवी विद्यालयात झाले.पुढील शिक्षण ८ ते १० लातुर येथील श्री शिवाजी माध्यमीक उच्च माध्यमिक विद्यालयात घेतले.तेथील टी व्हीशन,अभिसिका शाळेचा राहाण्याचा खर्च मोठ्या प्रमाणात आसल्याने त्यांनी नाशिक पुणे,सातारा येथे स्वतः रोड बिल्डींग वर जाऊन काँन्ट्याक दारासोबत खाजगी नौकरी करत लातुर येथील मुलींचा शिक्षणाचा खर्च केला. मुलींच्या शिक्षणासाठी मोठ योगदान त्यांच्या सौभाग्यवती सौ मिरा बळीराम झाटे लाभलं. मुलीनेही आपल्या आई-वडिलांच्या कष्टाचं चीज करत रात्रंदिवस आभ्यास मेहनत करत नुकत्याच १० बोर्ड परीक्षेत जाहीर झालेल्या निकालात ९९.८० गुण घेऊन बाजी मारली. स्नेहाचा आई वडीलांसह शिवाजी महाविद्यालयाने यथोचित सत्कार केला. तिच्या यशा बद्दल मा पं स मच्छींद्र झाटे,मा सरपंच विश्वासराव आगे,विश्वनाथ झाटे,मा स जालींदर झाटे,सरपंच अतुल झाटे,प्रा संजय झाटे,गोविंद झाटे,प्रा.सत्यप्रेम मगर सर,लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष अँड राज पाटील,रोहयोचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली सुरवसे,सरपंच अँड माधव शेंडगे,शेतकरी नेते जगदीश फरताडे,युवा नेते बालासाहेब बादाडे,पत्रकार रामेश्वर गोंडे,ऊ सरपंच गोविंद बादाडे,गोकुळ गवारे, अदींनी,डॉ प्रविन सावंत महिला ता अध्यक्ष जोस्नाताई बादाडे अदींनी शुभेच्छा दिल्या.

**माझ्या यशामध्ये माझे आई वडील आणि गुरुजनांचा सिंहाचा वाटा आहे.माझ्या वडीलांनी आम्हाला मुलगा मुलगी असा भेद न मानता खुप मेहनत करुन आम्हाला शिकवत आहे.मला पुढे डॉक्टर होऊन गोर गरीबांची सेवा करायची आहे.– स्नेहा झाटे( विद्यार्थी)**

पान १ वरून पुढे...

## वैष्णवी हगवणेचा...

पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. त्यामुळं सुनेला आत्महत्येस प्रवृत्त आणि हुंडाबळी केल्याप्रकरणी अजित पवार गटाचे पदाधिकारी आणि सासरे राजेंद्र हगवणेंसह सासू, पती शशांक, नणंद आणि दिरेवर गुन्हा दाखल आहे. यापैकी पती शशांक, सासू आणि नंदेला अटक करण्यात आलीये तर सासरे राजेंद्र आणि दिराचा शोध सुरु आहे. एकीकडे पोलिस राजेंद्र हगवणे यांचा शोध सुरू असल्याचा दावा करत असताना वैष्णवी यांच्या कुटुंबीयांनी मात्र हगवणे यांना तत्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. अजित पवार हे स्वतः वैष्णवीच्या लग्नात होते, त्यांनी आशीर्वादही दिले होते. दादांनी लाडक्या बहिणीला न्याय द्यावा अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. वैष्णवीचा हुंड्यासाठी अमानुष छळ केल्याचा सासरे राजेंद्र हगवणेसह सासू, पती, दिर आणि नणंद यांच्यावर आरोप आहे. प्रेम विवाहावेळी ५१ तोळे सोनं, फॉर्च्युनर गाडी अन चांदीची भांडी देण्यात आली. तरी जमीन खरेदीसाठी २ कोटींच्या मागणीचा तगादा लावला होता. तसंच पती शशांक हा चारित्र्यावरून संशयही घेत होता. वेळोवेळी शारीरिक आणि मानसिक छळ केल्यानं राजेंद्र हगवणेंची लहान सून वैष्णवीचा जीव गेला. अगदी असंच काहीसा मोठ्या सुनेचाही छळ हगवणे कुटुंबीयांनी केला होता. नोव्हेंबर २०२४मध्ये तिने पौड पोलीस स्टेशनमध्ये तसा गुन्हाही दाखल केला आहे.

## आदित्य, तुलसी...

कोणकोणत्या महाविद्यालयावर प्रवेशबंदी घालण्यात आली त्या २३३ महाविद्यालयांची यादी खालीलप्रमाणे. आदित्य कॉलेज ऑफ एम्बीए बीड,सूर्योदय ग्रामीण विकास संस्था राजश्री शाहू अध्यापक महाविद्यालय मोरेवाडी, अंबाजोगाई,आर्टस् -सायन्स अँड कॉमर्स कॉलेज कुसळंब,अपेक्स आयटी कॉलेज माजलगाव,मकसूद सेवाभावी संस्था संचलित डॉ अब्दुल कलाम कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मशन टेक्नॉलोजी कॉलेज नेकनूर,कॉलेज ऑफिस एज्युकेशन फॉर ऊमन, बीड,केशवराज सिनियर कॉलेज, दासखेड, ता पाटोदा,महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी, बीड.साईराम आर्टस्, सायन्स कॉलेज, युसूफ वडगाव.भाऊसाहेब कॉलेज ऑफिस एज्युकेशन, केज.स्व रामचंद्र धस कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स आष्टी.संभाजीराजे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स, शिरूर कासार.श्री बी एस पी एम अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई.जनता आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धानोरा. अध्यापक महाविद्यालय कारी.आदित्य इंजिनिअरिंग कॉलेज, बीड. एस.एस पी एम कॉलेज ऑफ एज्युकेशन आष्टी.जनशिक्षण महाविद्यालय आपेगांव.राजमाता जिजाऊ आर्टस् अँड सायन्स कॉलेज, मादलमोही. कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी, अंबाजोगाई. आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपळनेर.कॉलेज ऑफ फिजिकलं एज्युकेशन आष्टी.ज्ञानवर्धिनी बी सी ए अँड बी सी एस कॉलेज.जवाहरलाल नेहरू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज परळी.गुरुकुल कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड आयटी, बीड.एन एस एस आर आर्टस्, सायन्स कॉलेज, तेलगाव.डॉ विश्वनाथराव कराड कॉलेज ऑफ एज्युकेशन, केज. संत भगवानबाबा एम एड कॉलेज केज.श्री गुरु वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज आर्टस् कॉलेज मानूर.आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अंमळनेर.एस. एस. पी. एम. एस.आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, धानोरा.राजीव गांधी आर्टस्, सायन्स कॉलेज रायमोह.गुरुकुल कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड.महात्मा ज्योतिबा फुले कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी, चौसाळा.संभाजीराजे कॉलेज ऑफ लायब्ररी अन मॅनेजमेंट सायन्स, बीड.तुलसी कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड आयटी बीड.छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड मॅनेजमेंट. गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन अंबाजोगाई.आदित्य कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड.श्री मोरेश्वर कॉलेज गंगामसला ता माजलगाव.स्वामी विवेकानंद कॉलेज परळी.श्री तांबवेश्वर कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स अँड इन्फॉर्मशन टेक्नॉलोजी केज.आर्टस् अँड सायन्स कॉलेज आष्टी.

पान १ वरून पुढे...

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर अध्यापक महाविद्यालय गढी.आर्टस् अँड सायन्स कॉलेज चकलंबा.छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ लायब्ररी अँड इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी बीड.संत भगवानबाबा आर्टस् अँड सायन्स कॉलेज, घाटशिल पारगाव.स्व. शंकरराव गुट्टे ग्रामीण आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धर्मापुरी.जीवनदीप आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपळनेर.वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नलिझम अँड कॉम्पुटर सायन्स बीड.शाम गदळे आर्टस् कॉलेज दहिफळ.त्वरितापुरी आर्टस् अँड सायन्स कॉलेज तलवाडा.नालंदा कॉलेज ऑफ कॉम्पुटर सायन्स आष्टी. स्व रामचंद्र दादा धस सिनियर कॉलेज,देऊळगाव घाट आष्टी.पदमश्री अप्पासाहेब पवार सिनियर कॉलेज बरदापूर.कॉलेज ऑफ फार्मास्युटीकल सायन्स अँड रिसर्च आष्टी.मराठवाडा कॉलेज ऑफ इन्फॉर्मशन टेक्नॉलॉजी बीड.गुरुकृपा इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी माजलगाव.किशोरी कॉलेज ऑफ एम बी ए बीड.सुरज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट बीड.मिठूलालजी सारडा कॉलेज ऑफ एम बी ए बीड.आर्टस् अँड सायन्स कॉलेज मारफला.जीवन शिक्षण सायन्स कॉलेज केज.

## प्रत्येक परिणामकारक...

मोठ्याप्रमाणावर क्षोभ निर्माण झाला होता. या प्रकरणात मयत संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी सुरुवातीला हे प्रकरण सीआयडीकडे देण्यात आले. त्यानंतर या प्रकरणात न्यायालयीन प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविली जावी यासाठी सरकारी वकील म्हणून उज्वल निकम यांची नियुक्तीची मागणी केली गेली होती. त्याप्रमाणे या खटल्याच्या सुनावणीला उज्वल निकम यांनी काही वेळा हजेरी देखील लावली आहे. आता या खटल्याच्या संदर्भाने त्यांना देण्यात येणाऱ्या मानधनाच्या बाबतीत शासन निर्णय काढण्यात आला असून त्यात उज्वल निकम यांना प्रत्येक परिणामकारक सुनावणी करीत दिड लाख शुल्क देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे खटल्याच्या संदर्भाने विचारविनिमय शुल्क म्हणून प्रतितास ५० हजार देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मयत संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी कोणत्याही बाबतीतली कमतरता ठेवायची नाही यासाठी शासन कट्टीबद्ध असून त्याचाच एक भाग म्हणून उज्वल निकमांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

## हॉर्न वाजवल्याने...

ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन मुंडे, आदित्य गित्ते, सुमित उर्फ बबलू बालाजी गित्ते अशी आरोपींची नावे आहेत. यातीलच सचिन मुंडे, आदित्य गित्ते, आरोपी यांनी शिवराज दिवटे याला अमानुष मारहाण केली होती त्या आरोपीच्या अटकेनंतर हा व्हिडिओ व्हायरल झाला होता आता याही प्रकरण गुन्हा दाखल झाल्याने मुंडे आणि गित्ते टोळीचे पाय आणखी खोलात गेलाच दिसत आहे.

परळी तालुक्यामध्ये नंदागौळ गावातील योगीराज अशोक गित्ते (वय ३२) या शेतकऱ्याने नऊ महिन्यानंतर पोलिसांना फिर्याद दिली आहे. आदित्य व सचिन हे अनेकदा घरासमोरुन दुचाकीवरून ये-जा करताना हॉर्न वाजवायचे. एकेदिवशी त्यांची गाडी थांबवुन तुम्ही असे का करता, असे म्हणाल्यावर 'तुझ्या बापाचा रस्ता आहे काय, आम्ही काही पण करु. तू आमच्या नादी लागू नको नाही तर तुझ्याकडे बघावे लागेल' असे म्हणून ते निघून गेले. २५ जूलै २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता योगिराज हे घरी जाताना नंदागौळ ते घाटनांदुर जाणारे रस्त्यावरील पाण्याचे टाकीजवळ आल्यावर आदीत्य गित्ते व सचिन विष्णु मुंडे हे दुचाकीवरून आले.

योगिराज यांना अडवून त्यांची कॉलर पकडत दुचाकीवर बसवून विठ्ठल टेकडी येथे नेले. तेथे सुमीत हा होता. तेव्हा सचिन मुंडे व आदित्य गित्ते यांनी 'तू लई माजलास का आम्हाला रस्त्यात थांबऊन दुचाकीवर रेस का करतो म्हणून विचारतो का' असे म्हणून दोघांनी शिवीगाळ करुन सचिन मुंडेने बेल्टने तोंडावर, पाठीवर, पायावर आणि हातावर मारहाण करून जखमी केले. पुन्हा जर आमच्या नादी लागला तर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणून योगिराज यांना तेथेच सोडून ते निघून गेले. तक्रार दिली तर ते पुन्हा मारतील, या भितीने उशीर झाल्याचे कारण योगिराज यांनी दिले आहे.

पान १ वरून पुढे...

## छगन भुजबळांनंतर...

यादरम्यान, धनंजय मुंडे हेदेखील काही दिवसांतच मंत्रिमंडळात दिसतील, असा दावा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत छगन भुजबळ यांनी मंगळवारी (तारीख २० मे) कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली. महायुती सरकारमध्ये धनंजय मुंडे यांच्याकडे कॅबिनेट मंत्रिपद होतं. त्यांच्याकडे अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाची जबाबदारी देण्यात आली होती. हेच खातं छगन भुजबळ यांना मिळणार, असा अंदाज बांधला जात आहे. त्यावर बोलताना मला वाटतं कोणी कोणाला रिप्लेस करू नये. अशी रिप्लेसमेंट असेल तर त्यांना ओबीसींचा विश्वास कधीही मिळणार नाही. भुजबळांचं स्वतःचं कर्तृत्व आहे. स्वतः ची ओबीसीची ठाम भूमिका आहे. धनंजय मुंडे यांना पर्याय म्हणून भुजबळांना दिलं असेल तर ते ओबीसींना आवडणार नाही. मुंडे काही दिवसात राज्याच्या मंत्रिमंडळात दिसतील, हे मी महाराष्ट्राला जबाबदारीने सांगतो, असं हाके यांनी म्हटलं आहे.

## एपीआयच्या नावाने....

गुन्हा दाखल केला असल्याचा दावा सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ खांडेकर यांनी केला आहे. त्याचवेळी यातील एक आरोपी व पूर्वीचे फिर्यादी आनंद भगत यांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. त्यात अपर्णा वर्मा (दुबई) यांनी भगत यांना ५० लाख रुपये, शैलेश ठोंबरे यांना दीड कोटी आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांना साडेचार कोटी रुपये दिल्याचे पुरवणी जबाबात म्हटले आहे. या प्रकरणात आतापर्यंत अपर्णा वर्मा (दुबई) यांचा तक्रार अर्ज, २०२३ मध्ये आनंद भगत यांची २०२३ मध्ये फसवणुकीची फिर्याद, त्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ खांडेकर यांची बनावट स्वाक्षरी केल्याची फिर्याद (१५ मे २०२५), पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्वाती खेडकर यांच्या दोन फिर्यादी तसेच अपर्णा वर्मा यांची लोणीकंद पोलीस ठाण्यातील एक फिर्याद अशा किमान पाच फिर्यादी दाखल झाल्या आहेत. तरीही ही जागा नेमकी कोणाची आहे, याचा अजून उलघडा झालेला नाही. याबाबत खांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, अर्पणा यशपाल वर्मा (वय ५६, रा. दुबई) यांनी आनंद लालासाहेब भगत, शैलेश सदाशिव ठोंबरे यांना अपर्णा वर्मा या वाघोली येथील ४ हेक्टर जागेच्या मालक आहेत, हे माहिती असताना त्यांनी अपर्णा यशपाल वर्मा (तोतया) (रा. इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली) यांना अपर्णा वर्मा असे भासवून चंदननगर येथील दुय्यम निबंधक कार्यालयात २१ मार्च २०२३ मध्ये दस्त नोंदवून बनावट खरेदी खत केले असा अर्ज दिला होता. तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांनी त्याची चौकशी खांडेकर यांच्याकडे सोपविली होती. त्याचवेळी अपर्णा यशपाल वर्मा (रा. राजस्थान) आणि अपर्णा यशपाल वर्मा (रा. इस्लामपूर) यांचे मिळकती संदर्भात तक्रार अर्ज मिळाले होते. हे सर्व मुळ तक्रारी अर्ज राजेंद्र लांडगे यांच्या ताब्यात होते. सह दुय्यम निबंधक कार्यालयातून दोन दस्तांची नोंदणी झालेली नसल्याचे अभिप्राय मिळाले.त्या आधारे अर्जदाराविरुद्ध गुन्हा नोंद करण्याची पोलीस उपायुक्त परिमंडळ ४ यांच्या कार्यालयामधून परवानगी मिळणेकामी कार्यालयीन टिपणी तयार करण्यास वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र लांडगे यांनी खांडेकर यांना सांगितले. परंतु, १२ ते १५ मे २०२३ पर्यंत ४ दिवस किरकोळ रजेवर गेले होते. त्यामुळे त्यांनी अर्जावरुन गुन्हा नोंद करण्याची परवानगीची कार्यालयीन टिपणी तयार न करता रजेवर गेले होते. याबाबत तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्वाती खेडकर यांनी सांगितले की, या प्रकरणात इतकी गुंतागुंत आहे की, अजूनही ती मोक्याची १० एकर जागा नेमकी कोणाची आहे, हे सांगता येत नाही. याप्रकरणात लोणीकंद पोलीस ठाण्यात आणखी एका अपर्णा वर्मा यांनी अर्ज केला आहे. या प्रकरणाच्या तपासात पुढे आलेल्या पुराव्यानुसार फसवणुकीचे व बनावट कागदपत्रे तयार केल्याचे गुन्हे दाखल आहेत.

पान १ वरून पुढे...

## मुख्याधापिकेने पतीला...

असणाऱ्या मित्रांमध्ये कुजबुज सुरू झाली. पोलिसांनी मित्रांची चौकशी सुरू केली. त्यावेळी एकाच्या मोबाइलमध्ये शंतनूचा १३ मे रोजीचा फोटो दिसला. त्याच्या अंगातील सदरा आणि मृतदेहाजवळील कापडाचा तुकडा हे दोन्ही सारखेच आढळून आले होते. येथूनच पोलिसांची तपासाची दिशा निश्चित झाली. पहिल्यांदा आरोपी पत्नी निधीने पोलिसांना गुंगारा दिला. मात्र, तिच्या घरात आढळलेली अंडरवेअर व मृतदेहाच्या अंगातील अंडरवेअर एकाच कंपनीची असल्याने पोलिसांचा संशय आधिक बळावला. तिच्यावर मानसिक दबाव निर्माण करताच निधीने हत्येचा संपूर्ण घटनाक्रमच कबुलीतून सांगितला आहे. मृतदेह जाळण्यास मदत केलेल्या तीन अल्पवयीन विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुगलवरून तयार केले विष- शंतनू दारूच्या आहारी गेला होता. त्याच्यापासून सुटका मिळविण्यासाठी निधीने हत्येचा कट रचला. तिने गुगलवर सर्च करून विषारी ज्यूस तयार केले. दारूच्या नशेत असलेल्या शंतनूला पाजले. त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला.

## बीड जिल्हा आपत्ती ..

पोस्टाद्वारे किंवा आवक जावक शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे समक्ष सादर करावेत. या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुटीचे दिवस वगळून) प्राप्त झालेल्या विहीत नमुन्यातील अर्जाचा विचार करण्यात येईल. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या कंत्राटी पदासाठी शैक्षणिक अर्हता मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी, पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन) अशी आहे. तसेच प्राप्त अर्जांच्या छाननीनंतर भरती प्रक्रियेसंदर्भात पुढील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळ www.beed.nic.in वर प्रसिद्ध करण्यात येईल.

## परळी आगारात...

सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फेरफटका मारला. यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

## दोन लाखांची...

एसीबीने ही कारवाई केल्याने तिथे उपस्थित कर्मचार्यांमध्ये एकच खळबळ उडाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, यातील तक्रारदार एका गृहनिर्माण सोसायटीचे खनिजदार होते. या सोसायटीच्या पदाधिकार्यांनी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर कामं केली होती, त्यामुळे तक्रारदाराने त्यांना जाब विचारला होता. मात्र त्यातून झालेल्या वादानंतर तक्रारदाराला खनिजदार पदावरून काढून टाकण्यात आले होते. त्याविरोधात तक्रारदाराने अंधेरीतील उपनिबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयात तक्रार अर्ज केला होता. या अर्जानंतर संबंधित अधिकार्यांनी त्यांना पुन्हा सोसायटीच्या कमिटीवर घेण्याचे आदेश दिले होते. मात्र या आदेशाकडे सोसायटीच्या पदाधिकार्यांनी विशेष लक्ष दिले नाही. त्यामुळे तक्रारदाराने पुन्हा सोसायटीतील पदाधिकार्यांविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रार अर्जात नवीन सभासदांची नेमणूक करणे, त्यांच्या सोसायटीचे कमिटी सभासद बेकायदेशीर काम करत असून सोसायटीच्या कायद्याप्रमाणे काम करत नसल्याचे आरोप करून ही कमिटीच रद्द करण्याची मागणी केली होती.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पशुधन विकास अधिकारी पाठोपाठ आता पशुसंवर्धन विभागातील सहायक आयुक्त पदाच्या ३११ जागांसाठी भरती प्रक्रिया सुरू

## पशुसंवर्धन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे ठोस निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

पशुसंवर्धन विभाग अधिक सक्षम होण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विविध ठोस निर्णय घेतले आहेत. पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदांपाठोपाठ आता सहायक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जाहिरात प्रसिद्ध करून प्रक्रिया सुरू केली आहे. पशुसंवर्धन विभागाने पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी एकापाठोपाठ एक असे महत्वाचे निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. विभागातील रिक्त पदांमुळे पशुपालक, शेतकरी यांना सेवा देण्यास येणारी अडचण लक्षात घेऊन विभागातील आवश्यक पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी त्यांनी पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आले.

**कामास येणार गती–**

**ही भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पशुसंवर्धन विभागाला सक्षम आणि नवीन अभ्यासू अधिकारी मिळणार आहेत. त्यातून ग्रामीण भागातील पशुसंवर्धन विभागाचे काम आणखी वेगाने व पूर्ण क्षमतेने होण्यास मदत होणार असून पशुपालकांना चांगल्या दर्जाची सेवा मिळणार असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.**

त्यानंतर आता प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ या संवर्गातील सहायक आयुक्त, पशुसंवर्धन ही ३११ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून तसे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवले. या भरतीची प्रक्रिया वेगाने होण्यासाठी श्रीमती मुंडे यांनी पाठपुरावा केला.

एम पी एस सी ने सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली असून २० जून २०२५ पर्यंत अर्ज मागविले आहेत.

# नाथपंथी समाजातील 10 वी 12 उत्तीर्ण विद्यार्थ्याचा गुणगौरव सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**



नाथपंथी समाज बांधव यांनी काल दिनांक १८/५/२५ रविवारी दुपारी १० वी व १२वी मध्ये उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा काल हॉटेल साईप्रसाद माने कॉम्प्लेक्स जवळ या ठिकाणी मोठ्या थाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून श्री श्री १००८ शिवरुद्र आनंद स्वामी सरस्वती काशी विश्वेश्वर मठ हे होते .प्रमुख उपस्थिती ह भ प भरत महाराज जोगी परळी व ह भ प भरत महाराज बुधोडा , बालकनाथ यादव सर , भरत नाना चव्हाण यांची होती. या कार्यक्रमात अखिल भारतीय नाथपंथी समाज महासंघ , नाथ मुद्रा प्रतिष्ठान व नातमुद्रा बचत गट बीड यांनी विद्यार्थ्याबरोबरच काही व्यक्तींना उत्कृष्ट काम गिरीबद्दल समाजभूषण पुरस्कारही वितरित करण्यात आला या कार्यक्रमाला बीड जिल्ह्यातील दहावी व बारावी मधील उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार समीर शेख यांच्या भाचीचा विवाह सोहळा थाटात संपन्न

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी पाटोदा, शिरूर तालुक्याच्या कानकोपऱ्यात, प्रशासकीय, सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात व्यापक जनसंपर्क असलेले सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार समीर शेख यांच्या भाचीच्या विवाह प्रसंगी विविध क्षेत्रातील मित्र परिवार, स्नेही मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. या शुभप्रसंगी पाटोदा मा. नगराध्यक्ष आदम सय्यद, नगरसेवक आसिफ सौदागर, नगरसेवक श्रीहरी गीते, नगरसेवक नय्युम पठाण, सरपंच दत्तात्रय खोटे,मा.सरपंच विठ्ठल राख, शामीर भाई सय्यद, ह.भ.प विजय महाराज राजपुरे, ह.भ.प अशोक महाराज काकडे, विजय मरकड, उपसरपंच शेषराव भोसले, गणेश खिलारे, जयराम झिंजुर्के, कल्याण राऊत, जितेंद्र भोसले, धांडे सर, विशाल अर्सुळ ,आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम,पाटोदा तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सोमनाथ कोल्हे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष अब्दुल कादर मकराणी, तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षकतर संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजूभाई पठाण, पाटोदा तालुका परिषदेचे उपाध्यक्ष जावेद शेख, पत्रकार हमीद पठाण, पत्रकार पोपट कोल्हे,ज्येष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, पत्रकार अक्षय विधाते, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार मारुती संत्रे पत्रकार शेख महेशर,पत्रकार राजेंद्र लाड, रामकिसन गिते सर,पत्रकार विजय जाधव पत्रकार सतीश गर्जे, पत्रकार सचिन शिंदे,पत्रकार सज्जाद, पत्रकार अजीज भाई,सय्यद, सय्यद मिस्तरी, छगन भगत, सुनील सानप, शकील शेख,बशीर भाई शेख ,अन्सार शेख, युनुस शेख, इस्राईल शेख, सद्दाम शेख,नवाज मुलाणी, आयुब पठाण, आदी मान्यवर यांनी उपस्थित राहून वधू वराला शुभेच्छा दिल्या यावेळी समीर शेख यांनी दोन्ही परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

# एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री दस्त नोंदणी अमलात आणू नका

**बीड । प्रतिनिधी**



जमीन विकसन विक्रीच्या पावर ऑफ ऍटोर्नी व जमीन खरेदी विक्री दस्त नोंदणी या संदर्भात राज्य शासनाच्या एक राज्य एक दस्त नोंदणी प्रणाली स्थगित करण्यात यावी ही मागणी करत आज अखिल भारतीय मराठा महासंघ बीड जिल्हाच्या वतीने मा.अप्पर जिल्हाधिकारी मॅडम यांना एक सविस्तर निवेदन देण्यात आले.

महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय राजेंद्र कोंढरे यांच्या आदेशान्वये देण्यात आलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले की शासनाच्या प्रस्तावित या एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री दस्त नोंदणी जमीन विकसनच्या विक्रीच्या पॉवर ऑफ अटर्नी नोंदविण्यास सुरुवात केल्याने यात मोठा गैर व्यवहार होणार असल्याने, न्यायालयीन व प्रशासकीय यंत्रणेवर ताण येणार असल्याने याशिवाय नागरिक दर महिन्याला जमीन खरेदी विक्री करत नसल्याने केवळ सोयीसाठी काहीतरी नाविन्यपूर्ण करतो हे दाखवण्यासाठी हा शेतकरी घातक निर्णय अमलात आणू नये अशी मागणी करण्यात आली.

निवेदन देते वेळी मराठा महासंघाचे मराठवाडा सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले बीड जिल्हाअध्यक्ष बापुसाहेब साळुंके बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रमेश्वर कवट बीड जिल्हा उपाध्यक्ष बापुसाहेब मराठे जिल्हा उपाध्यक्ष शाम गायकवाड जिल्हा प्रशिध्दी प्रमुख सुरेश गिराम बीड जिल्हा संघटक राहून शिंदे जिल्हा सरचिटणीस बंडु आप्पा कोडगडे बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके निवेदनाच्या प्रती मा.मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री महसूल मंत्री पालकमंत्री महसूल राज्यमंत्री यांनाही ई–मेल द्वारे पाठवण्यात आल्या त्याचप्रमाणे अप्पर मुख्य सचिव, महसूल नोंदणी व मुद्रांक शुल्क महाराष्ट्र,नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य पुणे यांनाही पाठविण्यात आल्या असे प्रसिद्ध केलेल्या पत्रकात कळविले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत किडनी विकार तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**



जैन सोशल फेडरेशन अहमदनगर यांच्या वतीने संचलित बीड येथील आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहु बँकेजवळ, येथे बुधवार दिनांक २१ मे रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत मोफत किडनी विकार तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला बीड शहरासह परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. किडनी विकारांमध्ये अंगावर सूज येणे, लघवीचे प्रमाण कमी होणे किंवा लालसर होणे, किडनी जंतुसंसर्ग, डायलेसिसची आवश्यकता इत्यादी आजारांवर तपासणी आणि सल्ला देण्यात आला. तसेच किडनी प्रत्यारोपण (ट्रान्स्प्लांट) बाबतही मार्गदर्शन करण्यात आले. वैद्यकीय उपचार महाग होत चालले असताना, सर्वसामान्य रुग्णांना मोफत व सुलभ सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे, महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना मोफत डायलेसिस सेवा पुरवण्यात आली. या शिबिरात नेफ्रॉलॉजिस्ट डॉ. गोविंद कासट (अहमदनगर) व बीड येथील डॉ. विशाल कोटेचा यांनी ३५ रुग्णांची तपासणी केली. त्यांच्या सहकाऱ्यांनी देखील रुग्णसेवेत सक्रिय सहभाग घेतला. संत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेतून गेली २० वर्षे रुग्णसेवेत कार्यरत असलेले आनंदऋषीजी हॉस्पिटल हे राज्यातील एक ख्यातनाम रुग्णालय आहे. येथे १३०० पेक्षा अधिक कर्मचारी व २५० हून अधिक तज्ज्ञ डॉक्टर विविध क्षेत्रात सेवा देत आहेत. या शिबिरात डॉ. गोविंद कासट यांचा विश्वस्त विजयराज बंब, गौतम खटोड व जैन समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



*मुंबई :– वामा... लढाई सन्मानाची दि.२३ मे पासून संपूर्ण राज्यात धूमधडाक्यात प्रदर्शित होत आहे त्यानिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेऊन वामा... लढाई सन्मानाची चित्रपटाचा अभिनेता डॉ.महेशकुमार वनवे आणि त्यांच्या टिमने आशिर्वाद घेतले.*

# गुजर समाज बांधवांनी नेहमी ध्येय ठरवून कार्य करावे -रतन गुजर

**बीड । प्रतिनिधी**



जिल्ह्यातील गुजर समाज देवसेनेची विविध विषयावर प्रश्नांसाठी महत्वपुर्ण बैठक पंढरी कॉम्प्लेक्स, धानोरा रोड, बीड या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती या बैठकीला गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर, सुनिल बहिरवाळ, नारायण बहिरवाळ, लक्ष्मण बहिरवाळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील बैठक ही गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच समाज बांधव–भगिनींसाठी, समाजातील छोट्या–मोठ्या अडचणी सोडवण्यासाठी या बैठकीच्या माध्यमातून पदाधिकार्यांची बांधणी करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष रतन गुजर म्हणाले की गुजर समाज बंधु–भगिनी यांनी आपले ध्येय फिक्स करावे व त्या दिशेने मार्गक्रमण करावे एकदा का ध्येय फिक्स झाले की वाटचाल सोपी होते अन् ध्येय गाठता येते समाज प्रगत होतो आणि कोणतीही अडचण यामध्ये आली तर आम्ही बांधवांच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहू असे आश्वासन देखील त्यांनी दिले.

तसेच दि.३० मे २०२५ रोजी होणार्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन देखील यावेळी करण्यात आले आहे.या करिता मांडवजाळी राधाकृष्ण आश्रम या ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांनी आपले मार्क आणि नाव गुजर समाज देवसेनेच्या पदाधिकार्याकडे द्यावे म्हणजे आपली गैरसोय होणार नाही असे ते म्हणाले.

# कुठलाच पात्र लाभार्थी घरकुल सर्व्हेपासून वंचित राहू नये

## प्रशासनाला खबरदारी घेण्याच्या आ.संदीप क्षीरसागरांकडून सूचना

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या सेल्फ सर्व्हे ला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचण येत आहे. त्यामुळे कुठलाही लाभार्थी सर्व्हे पासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने सर्व ग्रामसेवकांना कडक सूचना द्याव्यात, असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले आहेत. ग्रामीण भागातील पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोबाइलद्वारे सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. तांत्रिक अडचणींमुळे आणि विलंबामुळे कोणताही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता सेल्फ सर्व्हे करण्यासाठी प्रशासनाकडून मुदतवाढही देण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक पात्र लाभार्थी हे अशिक्षित आहेत तसेच अनेकांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि अनेकांना तांत्रिक माहिती नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचणी येत आहेत. या बाबींचा विचार करून गावपातळीवर, ज्या पात्र लाभार्थींना सेल्फ सर्व्हेबाबत अडचणी आहेत त्या लाभार्थींचा सर्व्हे ग्रामसेवकांनी करून द्यावा. एकही पात्र लाभार्थी सेल्फ सर्व्हे पासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्याचे कडक निर्देश ग्रामसेवकांना द्यावेत. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी बीड व शिरूर (का.) यांना दिल्या आहेत.

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

● epaper.marathwadapatra.com

गुरूवार, दि.२२ मे २०२५



## गोविंद सोनाजी जाधव यांचे दुःखद निधन

**बीड । प्रतिनिधी**

येथील मौजे ईट गोविंद सोनाजी जाधव यांचे बुधवार दिनांक २१ मे रोजी वय ५५ वर्षे दुःखद निधन झाले. गोविंद सोनाजी जाधव हे पिपळगाव वरून ईट कडे येत असताना मंगळवार या दिवशी अज्ञात वाहनाने पाठीमागून जोराची धडक दिल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला एका खाजगी रुग्णालयामध्ये त्यांना ऍडमिट करण्यात आले होते. मात्र डोक्याला जास्त मार जास्त असल्याने बुधवार दिनांक २१ मे रोजी त्यांचे दुःखद निधन झाले मौजे ईट येथे लाईन मॅन म्हणून काम करत असत त्यांचा मनमिळावू स्वभाव असल्याने ईट येथे नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले आहेत. त्यांच्यावर बुधवारी सायंकाळी आठ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.





# अवकाळी पावसाने फळबागा उध्वस्त

## पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यात तीन दिवसा पासुन सुरू असलेल्या अवकाळी पाऊस आणि वादळ व वाऱ्याम ुळे केळी, आंबा, मिरची यासह शेती पिकाचे, घरांचे म ोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे अवकाळी पाऊस, वादळी वाऱ्याने शिवारात उभ्या असलेल्या पिकांना अक्षरशः जमिनदोस्त केलं आहे त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत तांदळवाडी येथे फळबागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तालूक्यातील नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे. धारूर तालुक्यात तिन दिवसा पासुन रोजच अवकाळी पावसानै शेतीचे मोठे नुकसान केले शेतकरी हातबल झाला आहे तांदळवाडी येथे २० में मंगळवार रोजी अवकाळी पावसा व वादळवाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतातील उन्हाळी

मूंग, कांदा, मिरची, भाजीपाला पिके, केळी,आंबा फळबागा, शेतातील जनावराची निवारा, घरे यांचे अतोनात नुकसान झाले सिध्देश्वर काळे, महादेव साखरे, अंगद साखरे, गणेश साखरे आदी शेतकऱ्यांनचे मोठे नुकसान झाले आहे तालूक्यात सर्वत्रच या नुकसानीचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागला आहे त्यामुळे या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी आशी मागणी होत आहे

## काँग्रेसच्या वतीने बीड मध्ये तिरंगा रॅली संपन्न

### मोटार सायकल रॅली काढून सैनिकांच्या प्रति काँग्रेसने दाखवली सद्भावना

**बीड । प्रतिनिधी**

पाकिस्तानच्या सततच्या भ्याड हल्ल्याला भारतीय सैन्याने मोठ्या ताकतीने उत्तर देत पाकिस्तानला चार दिवसांत गुडघे टेकायला लावले व भारतीय सैन्याने मिळवलेला हा विजय केवळ सैन्याचा आहे म्हणून भारतीय सैन्याला सलाम करण्यासाठी व भारतीयांची असलेली संवेदना हिच खरी देशभक्ती असून या वीरांच्या पराक्रमाला वंदन करण्यासाठीच काँग्रेस पक्षाच्या वतीने तिरंगा रॅली चे आयोजन करण्यात आले होते.

बीड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून या रॅलीची सुरुवात



काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील आंबेडकर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, जिल्हाधिकारी कार्यालय सम ोरून जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यालयात शहीद जवानाच्या प्रति संवेदना व केलेल्या शौर्याला सलाम व्यक्त करत या रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, प्रवीणकुमार शेप, गणेश बजगुडे, श्रीनिवास बेद्रे, परवेज कुरेशी, संभाजी जाधव, गणेश राउत, विष्णू मस्के, प्रकाश मुंडे, पांडुरंग मस्के, ▶▶ उर्वरित पान २ वर

### स्व. राजीव गांधी यांना अभिवादन...!

**आज भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न स्व राजीव गांधी यांचा स्मृतिदिन असल्याने जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले यावेळी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या सह सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**

## कुर्ला ग्रामस्थांचा इशारा : वीज पुरवठा सुरळीत न झाला तर उपोषण अनिवार्य

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून गावात सुरू असलेल्या अनियमित वीज पुरवठ्यामुळे त्रस्त झालेल्या कुर्ला (ता. बीड ) ग्रामस्थांनी अखेर आवाज उठवला आहे. दिनांक २१ मे रोजी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने वीज वितरण कंपनी पेंडगाव येथील कनिष्ठ अभियंत्यांना निवेदन देत या सम स्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली.



या वेळी गावातील युवक तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, वारंवार वीज खंडित होणे, कमी दाबाचा पुरवठा आणि वेळोवेळी येणारे तांत्रिक बिघाड यामुळे शेतकरी, विद्यार्थी आणि गृहिणी यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

ग्रामस्थांनी स्पष्टपणे सांगितले की, वीज वितरण व्यवस्थित न झाल्यास गावकऱ्यांना उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल. याशिवाय, गावातील गावठाण फिडरची वीज जोडणी लवकरात ▶▶ उर्वरित पान २ वर

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आष्टी व पाटोदा तालुका स्तरावर बैठका

### जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व महेबुब शेख यांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाची आष्टी व पाटोदा येथे तालुका स्तरावरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्वपूर्ण बैठका गुरूवार दि. २२ मे २०२५ रोजी सकाळी ११ वा.साईदत्त मंगल कार्यालय आष्टी येथे तर दुपारी ३ वाजता पाटोदा येथे बैठका आयोजित केल्या आहेत.पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या



प्रमुख मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या बैठकीस प्रदेश युवक अध्यक्ष महेबुब शेख, प्रदेश उपाध्यक्ष ड.नरसिंह जाधव, प्रदेश सरचिटणीस ड. हेमाताई पिंपळे, महिला आघाडी देशमुखताई आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य निवडणुका घेण्याचा निर्णय राज्य सरकारला दिला आहे. या निवडणुका आगामी काळात कधीही होऊ शकतात. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषदा या निवडणुका ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या जिल्हा परिषद परिसरात शिवसंग्रामच्या कृष्णा उखंडे यांच आमरण उपोषण

**बीड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील ऊसतोड मजुरांच्या बोगस हंगामी वस्तीग्रह २०२४ ,२५ ची चौकशी करून संबंधित गटशिक्षणाधिकारी केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक व चौकशी अधिकारी श्रीमती मैना बोराडे यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे यासाठी



आमरण उपोषण धारूर येथील शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष कृष्णा उकंडे यांचं बीड जिल्हा परिषद आवारात आमरन उपोषण चालू आहे , आपल्या कार्यालामार्फत सदरील तक्रारीचे अनुषंगाने चौकशी समितीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी चौकशी दरम्यान गावनिहिय हंगामी वस्तीगृहाचे चावडी वाचन करण्यात यावे, यामध्ये पालक व विद्यार्थ्यांचे जबाब नोंदवण्यात यावे व सदरील चौकशी इन कॅमेरे करण्यात यावी यासाठी मी जिल्हा परिषद परिसरात आमरण उपोषण करीत आहेत, व गटशिक्षणाधिकारी कार्यालय धारूर ▶▶ उर्वरित पान २ वर

## विनयभंग केल्याचे आरोपातून दत्ता बाबासाहेब तोंडे यांचे निर्दोष मुक्तता

### धारूर न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निकाल

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिनांक ८/१०/२०१६ रोजी दुपारी ठीक दोन वाजण्याच्या सुमारास घरी एकटे असताना आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे राहणार नागझरी तालुका केज जिल्हा बीड ह. मु. साळेगाव ता. केज जिल्हा बीड यांनी फिर्यादीचे घरात जाऊन घरात कोणी नसल्याचे पाहून फिर्यादीचे हाताला वाईट हेतूने धरून तिचा विनयभंग केल्या प्रकरणी फिर्यादीने पोलीस स्टेशन धारूर येथे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीचे विरुद्ध कलम ३५४,४५२, ५०४,५०६ भारतीय दंड संहिता नुसार गुन्हा क्रमांक १८२ २०१६ प्रमाणे दाखल झालेला होता सदर प्रकरणात पोलीस स्टेशन धारूर यांनी तपास करून आरोपी विरुद्ध



कलम ३५४ ४५२ ५०४ ५०६ भारतीय दंड संहितेप्रमाणे माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब धारूर यांच्या न्यायालयात चार्जसीट दाखल केलेले होते. सदर प्रकरणी माननीय प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी साहेब धारूर यांचे न्यायालयात फिर्यादी व साक्षीदार यांच्या साक्ष पुराव्यानुसार आरोपी दत्ता बाबासाहेब तोंडे व फिर्यादीचे भाऊ यांनी सिद्धनाथ सहकारी साखर कारखाना येथे ऊस तोडणी मुकादम म्हणून काम केलेले असून फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ यांच्याकडे राहिलेल्या बाकी मुळे ▶▶ उर्वरित पान २ वर

## मान्सून पूर्व कामे रखडली, अवकाळी पावसाने पालिकेच्या कारभाराचा बुरखा फाटला

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

शहरातील मान्सूनपूर्व कामांना वेळेत पूर्ण करण्याच्या दृषटीकोनातून पालिका प्रशासनाने नियोजन करून करा आवश्यक तेवढे काम वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. यात रस्त्यांवरील खड्डे बुजवणे, नाले स्वच्छ करणे, झाडांची फांद्या छाटणे, रस्त्यावर



गटाराचे पाणी येऊ नये यासाठी आवश्यक त्या ठिकाणी सुधारणा वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसाने शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार २७ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होणार ▶▶ उर्वरित पान २ वर

# एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री दस्त नोंदणी अमलात आणू नका

### अखिल भारतीय मराठा महासंघाची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

जमीन विकसन विक्रीच्या पावर ऑफ ऍटोर्नी व जमीन खरेदी विक्री दस्त नोंदणी या संदर्भात राज्य शासनाच्या एक राज्य एक दस्त नोंदणी प्रणाली स्थगित करण्यात यावी ही मागणी करत आज अखिल भारतीय मराठा



महासंघ बीड जिल्हाच्या वतीने मा.अप्पर जिल्हाधिकारी मॅडम यांना एक सविस्तर निवेदन देण्यात आले. महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माननीय राजेंद्र कोंढरे यांच्या आदेशान्वये देण्यात आलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले की शासनाच्या प्रस्तावित या एक राज्य एक नोंदणी अंतर्गत खरेदी विक्री दस्त नोंदणी जमीन विकसनच्या विक्रीच्या पॉवर ऑफ अटर्नी नोंदविण्यास सुरुवात केल्याने यात मोठा गैर व्यवहार होणार असल्याने, न्यायालयीन व प्रशासकीय यंत्रणेवर ताण येणार असल्याने याशिवाय नागरिक दर महिन्याला जमीन खरेदी विक्री करत नसल्याने केवळ सोयीसाठी काहीतरी नाविन्यपूर्ण करतो हे दाखवण्यासाठी हा शेतकरी घातक निर्णय अमलात आणू नये अशी मागणी करण्यात आली. निवेदन देते वेळी मराठा महासंघाचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## देवडीच्या स्नेहा झाटे चा लातुरात डंका ; 10 वी परीक्षेत ९९.८० गुण



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील देवडी अशा ग्रामीण भागातील स्नेहा बळीराम झाटे ने नुकत्याच १० बोर्ड परीक्षेत लातुर येथील श्री शिवाजी माध्यमीक व उच्च माध्यमीक विद्यालय येथे ९९.८० टक्के गुण घेऊन शाळेत प्रथम क्रम ांक पटकावल्याने तिच्यावर सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तालुक्यातील देवडी येथील बळीराम तुकाराम झाटे यांना दोन म ुली आई वडील पत्नी असा परिवार आहे. दोन एकर शेती शेतातील ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK